I
N
T
E
R
N
A
T
I
O
N
A
L

R
E
S
E
A
R
C
H

F
E
L
L
O
W
S

A
S
S
O
C
I
A
T
I
O
N

July - August - September - 2023 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 10, Issue No. - 3

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Smt. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Swati Lawange, Yeola(Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

July - August - September - 2023

E-ISSN - 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 10, Issue No. - 3

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Smt. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Swati Lawange, Yeola(Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

Swatidhan International Publications

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source : Internet) : Aditya L1 - India's First Dedicated Solar Mission

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue No. - 3 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
Impact Factor 6.625
E-ISSN : 2348-7143
July - Sept - 2023

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Impact of Modernization on Yimkhiung Traditional System | S. Obed Yimchunger | 5 |
| 2 | Stylistic Study of Midnight's Children | Dr. Vijay Matkar Miss. Geeta Bansode | 10 |
| 3 | Shakespearean Adaptations in Global Cinema: A Cross-Cultural Analysis of Bard's Works on Screen | Mr. Kunal Katkade | 15 |
| 4 | Study of Factors Influenced the Viewers in the Discretion of the Movie | Dr. Swapnil Gaikwad | 26 |
| 5 | Effective and Satisfactory Disputes Resolution in Lok Adalat - A Case Study | Dr. Atul Kurane | 30 |
| 6 | Enhancing Mathematics Education: Integrating Active Learning Strategies, Technology, and Early Education for Effective Teaching and Learning | Dr. Najma Begum | 41 |
| 7 | Mapping Social- Legal Identity and Inequality :A Sociological Exploration of the Impact of Covid-19 Pandemic on Women Street Vendors in Urban Areas | Manish K. Verma, Riya Singh | 50 |
| 8 | Role of Women Entrepreneurs | Dr. Bhausaheb Darekar | 61 |
| 9 | Algal Dominance in Contaminated Water Region of Godavari River | Sayali Chavhan, Kajal Kankute, Umesh Dhuldhaj | 67 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 10 | शिवानी की कहानियों में शाश्वत मूल्य | ममता यादव | 77 |
| | **मराठी विभाग** | | |
| 11 | आसाळी आणि मरीआईचा विधी यांच्यातील साम्यस्थळे | डॉ. गिरीष गायकवाड | 82 |
| 12 | मराठी महानगरीय कविता | डॉ. अतुल चौरे | 88 |
| 13 | ना. धों. महानोर यांच्या 'पानझड' कविता संग्रहातील निसर्गचित्रण | सौ. स्वाती ढवाण-पाटील | 95 |
| 14 | कामगार जीवनाचा वेध घेणारे 'माझे विद्यापीठ' | डॉ. आर.डी.शिंदे | 100 |
| 15 | १९८० नंतरची वाङ्मयीन नियतकालिके | शुभांगी बारवकर | 107 |
| 16 | 'अंतर्नाद' मासिकातील कवयित्रींच्या कवितेतील भावविश्व | शुभांगी बारवकर | 110 |
| 17 | TDM एका पिढीचा ऐतिहासिक दस्तऐवज | डॉ.गणपतराव ढेंबरे | 115 |
| 18 | महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक एक विवेचन | नितीन वामन, डॉ. डी.के.होळकर | 118 |
| 19 | भारतातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 126 |
| 20 | अनुत्पादक जिंदगीचे सहकारामधील स्थान, कारणे, परिणाम व उपाय | स्वाती कोंढाळकर, डॉ. रमेश दरेकर | 131 |
| 21 | अनुदानित विना अनुदानित शिक्षकांच्या स्व:संकल्पनेचा अभ्यास | डॉ. बी.यु. पवार | 141 |
| 22 | महाराष्ट्राच्या राजकारणातील घराणेशाही: एक अभ्यास | डॉ. अनिल देशमुख | 145 |
| 23 | शोधचक्र : संशोधन प्रक्रिया व्यवस्थापन प्रणाली | हितेश ब्रिजवासी, प्रिती पाटील | 152 |
| 24 | उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाशी सहसंबंधात्मक अभ्यास | विजय वाकोडे, डॉ. मोहन खताळ | 160 |
| 25 | भारतीय संविधानातील कलम 370 : एक अभ्यास | डॉ. अरुण शेळके | 164 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor 6.625 | Peer Reviewed Journal | July - Sept - 2023

# कामगार जीवनाचा वेध घेणारे 'माझे विद्यापीठ'

प्रा.डॉ.आर.डी.शिंदे.
मराठी विभाग प्रमुख
कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,इगतपुरी
ईमेल. com

**सारांश :**

*महाराष्ट्र राज्य ही परीवर्तनाची भूमी आहे. साधूसंत, समाजसुधारक आणि विचारवंताचा वारसा जतन करणारी आहे. साधूसंत आणि समाजसुधारकांनी आपल्या लेखणीच्या, वाणीच्या आणि कार्याच्या माध्यमातून उपेक्षित, दलित, आदिवासी आणि कष्टकरी माणसांच्या जीवनाचा, त्यांच्या मनाचा आणि जीवनात येणाऱ्या अडचणींचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी साहित्यिकांनी साहित्याच्या माध्यमातून समाजपरीवर्तन करण्याबरोबरच उपेक्षित व कष्टकऱ्यांच्या कष्टाला न्याय देणे, त्यांना सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक न्याय मिळावा, यासाठी कामगार साहित्य लेखनाचा मार्ग स्वीकारला. कामगार जीवनाचे चित्रण करीत कामगार साहित्य लेखनाची परंपरा निर्माण झाली. कामगार साहित्याबद्दल सदा कऱ्हाडे लिहितात,'' कामगारांच्या वास्तव जीवनाचे दर्शन घडविणारे तसेच कामगारांच्या जीवनानुभवांचे, त्यांच्या संवेदनांचे, जाणिवांचे दर्शन घडविणारे साहित्य म्हणजे कामगार साहित्य.'' [१] कामगार साहित्यिकांमध्ये कवी नारायण सुर्वे यांचे नाव महत्वाचे मानले जाते. त्यांनी आपल्या काव्याच्या माध्यमातून कष्टकरी वर्गाला समाजव्यवस्थेमुळे होणाऱ्या शारीरिक, आर्थिक आणि मानसिक त्रासाचे चित्रण केले आहे. माणूस म्हणून जगण्याचे दिलेले हक्क मिळाले सर्वांना पाहिजे, ही त्यांची भूमीका सामाजिक न्याय मिळवून देणारी आहे. काव्याच्या माध्यमातून कामगार वर्गाचे जीवन, त्यांचा संघर्ष, समाजिक स्थिती आणि कौटुंबिक जबाबदारी पूर्ण करण्याचा केलेला प्रयत्न दिसून येते. त्यामुळे अशा महान कवीच्या कार्याचा आणि काव्यातील कष्टकरी कामगर वर्गाच्या जीवनाचा शोध निवडक कवितांच्या आधारे घेऊ*

**प्रस्तावना :**

कवी नारायण सुर्वे यांनी काव्य लेखनाच्या माध्यमातून कष्टकरी, कामगारी वर्गाचे, त्यांच्या कुंटुबाचे आणि सामाजिक परिस्थितीचे चित्रण केले. कामगार वर्गाच्या समस्या आणि समाजाच्या बदलत्या परिस्थितीमुळे निर्माण होणारी परिस्थिती वाचकांना ज्ञात करून दिली. कवी नारायण सुर्वे हे समाजचिंतन कवी आहेत. समाजाच्या उपेक्षित कष्टकरी समाजाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन उदार असून, कामगार जीवन आणि त्यांच्या जीवनाचा उद्धार करणे हेच काव्यलेखनाचे धोरण दिसून येते. त्यासाठी काव्यालेखनाच्या माध्यमातून कामगार वर्गाचे जीवन आणि त्यांच्या समस्या मांडलेल्या आहेत. चार भिंतीमधील शिक्षण मिळून माणूस अक्षरज्ञानी होतो. चारभिंतींच्या पलीकडचे जीवनशिक्षण हे जीवनाच्या शाळेत मिळते. समाजात जगत असताना आलेले अनुभव, भेटलेली माणसं

आणि जीवनाच्या यशासाठी करावा लागणारा संघर्ष, या सर्वांमधून मानवास नवी वाट मिळत असते. जीवनव्यवहारातून मिळालेले शिक्षण खऱ्या अर्थाने माणसाचे जीवनज्ञान समृद्ध करीत असते. त्याचा प्रत्यय कवी नारायण सुर्वे यांचा 'माझे विद्यापीठ' हा कवितासंग्रहाचे वाचन करीत असताना पहावयास मिळतो. यासाठी आपण काही निवडक कवितांचा विचार करू

**गृहितके :**

१. कामगार जीवनविषयीचा चिंतनाचा केलेले आहे.
२. कामगार वर्ग कुटुंबाच्या हितासाठी प्रयत करतो.

**उद्दिष्टये :**

१. कामगार जीवनातील संघर्ष शोधणे.
२. कामगारांच्या सुखासाठी मांडलेले विचार शोधणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंधात विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**१) जीवनव्यवहारातून अनुभवलेली स्व:ची जाणीव :**

माणासाला विविध विषयांचे ज्ञान हे केवळ चार भिंतींच्या शाळेत मिळते. चार भिंतीच्या शाळेतून मिळालेले केवळ पुस्तकी ज्ञान जीवनात उपयोगी ठरते असे नाही. तर काही ज्ञान हे दैनंदिन जीवनात आलेले अनुभव आणि त्यातून मिळालेला धडा माणसांचे जीवनज्ञान समृद्ध करते. जीवनात आलेल्या संकटांना आणि संघर्षाला तोंड देण्यासाठी माणसाला आधारासाठी स्व:तचे घर, नातेवाईक सोबत असावेत असे वाटते. पण काहींच्या नशिबात मात्र या गोष्टी येत नाहीत. संकट किंवा अडचणी प्रसंगी सोबत किंवा कोणाचा आधार नसला तरी कोणाचा तरी आधार सोबत घेऊन माणसाला जगावे लागते. दुसरीकडे कोणाचाही आधार नसणारा नायक स्व:ला सोबत घेत संघर्ष करीत असतो. आलेल्या संकटाशी सामना करीत असतो. संघर्ष करीत राहणे हीच कवीची दृष्टी येथे दिसून येते. कवी नारायण सुर्वे यांच्या काव्यलेखनाबद्दल कवी कुसुमाग्रज लिहितात,'' श्री सुर्वे यांची कविता बरीचशी लढाऊ वृत्तीची आहे. समाजक्रांतीची उपासना करणारी आहे. नव्या आनंदवन भुवनाचे स्वप्न पहाणारी आहे.'' [२] कवीने कोणाची आधार मिळत नसल्यामुळे आधार म्हणून सार्वजनिक इमारतींचा वापर केला. सार्वजनिक जीवनात जगत असताना, कवीला आपल्या स्व:ची जाणीव झाली. स्व: शोधण्याचा प्रयत्न केला. स्व: भक्कम बनविण्याचा प्रयत्न केला. जीवनात आलेल्या अनुभवांचे चित्रण कवी नारायण सुर्वे आपल्या ''माझे विद्यापीठ' या कवितेत करताना लिहितात.

**'' ना घर होते ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालीची जमीन होती.**
**दुकानांचे आडोसे होते: मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती.''** [३]

समाजव्यवस्थेत संघर्ष हा माणसाच्या जीवनाचा भाग आहे. संघर्षात कोणाची साथ मिळत नसल्यामुळे कवीने, भोवतालच्या वाडयांना आधार घेत जगण्याचा आपला हक्क मिळविला. संघर्ष करीत जीवन जगणे हे कवीला ज्ञात झाले. जगण्याच्या या संघर्षात जातीपातीच्या राजकारणात आणि सत्ता संघर्षात आजपर्यंत अनेकदा जातीय आणि धार्मिक

दंगली घडत असतात. या धार्मिक दंगलीत कवीला संभाळणारा, आधार देणार, याकुब मारला जातो. जातीचा वा धर्माचा द्वेषामुळे माणसाला आपला जीव गमवावा लागतो. कवीचा याकुबचा मिळणारा आधार संपतो. हेच कवीला सहन होत नाही.कवीचे चिंतनशिल मन जागृत होते. जीवनाच्या शाळेत मिळालेला जातीपातीचा आणि धर्मसंघर्षाचा धडा आणि त्यातून होणारे नुकसान यांचा विचार करता, मनात भिती निर्माण झाली. समाजाचे वास्तव स्वरूप समोर दिसू लागले. अशा वेळी कवीचे स्व:मन चिंता करू लागले. या संघर्षामध्ये कामगार समूहाचे शोषण होते. हे कवी नारायण सुर्वे यांनी काव्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडले आहे. श्रमिक वर्गाचे चित्रण करणारे कवी नारायण सुर्वे यांच्या काव्याबद्दल स.त्र्यं.कुल्ली लिहितात, '' सुर्व्यांची कविता ही शोषित पीडित श्रमिकवर्गाच्या व्यथावेदनांची जीवनसंघर्षाची आणि त्यातून उमलणाऱ्या क्रांतिस्वप्नाची कविता आहे.'' ४ तर दुसरीकडे या दुनियेत आपण कसे वागले पाहिजे, कसे जगले पाहिजे.? याचे चिंतन करताना कवी लिहितात.

'अशा नंग्याच्या दुनियेत चालायची वाट, लक्षात ठेव सगळया खाणाखुणा' (पृष्ठ १३)

परिस्थितीनुसार माणसं बदलतात. सूड घेतात. आज सगळीकडे माणसांची गर्दी वाढली. पण माणसांसाठी माणूस दिसत नाही. सत्ता आणि संपत्तीमुळे समाज स्वार्थी, मतलबी आणि राजकारणी झाला आहे. मानवतेचा प्रकाश पेरणारा माणूस कुठे दिसत नसल्याची खंत व्यक्त करताना, कवी लिहितात,

'' नाही सापडला खरा माणूस: मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो.?
सदतीस जिने चढून उतरताना मीही नाही का कैकदा गोंधळून झापडलो. ''

किंवा

'' किती वाचलेत चेहरे किती अक्षरांचा अर्थ उतरला मनात
इथे सत्य एक अनुभव बाकी हजार ग्रंथराज कोलमडून कोसळतात.'' ५

जगाच्या नजरेत आपण कुठे आहोत किंवा आपले कोणी आहेत ? याचा शोध घेणे आवघड झालेले आहे. बदलत्या समाजाच्या मानसिकतेमुळे कवीला आपली वाट आपणच चालू ठेवावी असे वाटते. समाजात अनेक अनुभव आलेले आहेत. खोटयांच्या दुनियेत सत्याचा वाली दिसत नाही. स्वार्थासाठी,सत्तेसाठी सगळी दुनिया बेईमान झाली, तरी कवीचे मन बेईमान होत नाही. जगण्याच्या या संघर्षात त्यांनी नेहमीच सत्य जपण्याचा प्रयत्न केला. 'एक आम्ही असे निघालो' या कवितेत कवी लिहितात,

'' प्रत्येक रात्र आत्म्याशी चर्चा करण्यात घालविली एक आम्हीच असे निघालो: बेइमान झालो नाही'' (पृष्ठ २०)

इमानदारीत जगण्यात अभिमान असायचा. कवीचे स्व: मन सतत सत्यासाठी, चांगल्यासाठी, आदर्शासाठी ईमानदारीत वागत होते. एका बाजूला कामगार वर्गाचे शोषण होत आहे. पिळवणूक होत आहे. असे असले तरीही हेच कामगार सत्याचा आणि आदर्शाचा प्रकाश सतत ठेवत आहेत.

समाजात माणूस म्हणून जगण्यासाठी चांगले वातावरण नसताना, आपली वाट आपणास शोधावी लागते. सत्य आणि आदर्श नितीमत्ता हीच आपली वाट निवडावी लागते. त्यासाठी परिस्थितीमुळे आलेल्या संघर्षाला तोंड देण्यासाठी कवी लिहितात,

'' जगायालाच हवे आपलेसे करायलाच हवे कधी दोन घेत कधी दोन देत.'' ( पृष्ठ १६)

समाजात वावरत असताना, कधी आक्रमक व्हावे तर, कधी नमते घ्यावे. तसे केले तरच माणूस म्हणून जगता येणे शक्य आहे. आपला समाज आपल्या समाजासाठी चांगले करील, असा विश्वास ठेवून पुढे जावे असे कवीला वाटत नाही. जगाकडून अथवा नशिबाकडून चांगली अपेक्षा ठेवण्यापेक्षा स्व:त जगणे, शिकणे, धडपडणे या सर्वांमधून घडणे महत्वाचे मानतात. म्हणूनच 'स्वत:ला न रचित गेलो.' या कवितेत कवी लिहितात.

'' आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही
उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही.'' पृष्ठ २८

मुंबईत राहणारे कवी कधी नशिबावर किंवा कुणाच्या मदतीवर आवलंबून राहत नाही. जगण्यासाठी स्वाभीमान महत्वाचा मानला. कधीच कोणापुढे स्वाभीमान झुकू दिला नाही. मुंबई हे शहर कष्टकऱ्यांसाठी रोजी रोटी देणारे शहर आहे. याच शहरात कामगार वस्ती करून अनेकजण आपल्या कुटुंबाचा उधरनिर्वाह करतात. मुंबईच्या खुराड्यात मुलं लहानाची मोठी होतात. गिरणीत काम करणारा बाप रिटार्यट झाला की, बापाच्या जागेवर कामगाराचा मुलगा आपल्या नोकरी करतो. रोजीरोटी देणाऱ्या मुंबई शहराबद्दल कवी लिहितात,

'इथेच या सागरतीरी झुंजतच त्यानेही देह ठेवला,
त्याच्याच साच्यावर दमेकरी मुकादमाने मला नेमला.'' (पृष्ठ ३४ )

कामगारांनी मुंबई शहरातील साफ सफाई करून मुंबई शहर स्वच्छ आणि सुंदर केले. पण पैसेवाल्यांच्या दुनियतेत त्यांच्या कष्टाला न्याय नाही. त्यांचे शहरात असणे देखील शहरवासीयांना नको आहे. शहर स्वच्छ करणारी माणसं आपल्या शेजारी नकोतए सार्वजनिक ठिकाणी नकोत. या वास्तवतेचे चित्रण करताना कवी लिहितात,

'' नरकासम चाळीत राहून स्वच्छ करतो तुझे रस्ते,
उठवलो जातो कधी दंडुकेवाले जसे उठवतात फिरस्ते.'' (पृष्ठ ३५)

कवीने आपल्या निवडक काव्याच्या माध्यमातून समाजव्यवस्था आणि सर्वसामान्य कामकरी माणूस यांच्यातील संबंध दर्शवित कामगारांच्या जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे.समाजव्यवस्थेमुळे त्यांचे होणारे शोषण थांबविणे गरजेचे आहे. जीवन जगत असताना सातत्याने संघर्ष करावा लागत असला तरीही त्यांनी स्व: कधीही कामगारांनी गमावलेला नाही.हे काव्याचे वाचन करताना दिसते.

२) जीवनाचा अर्थ सत्य शोध :

कष्टकऱ्यांचे जीवन संघर्षांनी, संकटांनी सोबत माणुसकी व प्रेमाने भरलेले आहे. कौटुंबिक प्रेम आणि वास्तवता यांच्यातील सांगड घलताना, कवीने स्व:शी संघर्ष करता करता, कुटुंबाशी संघर्ष केला. कौटुंबिक प्रेमाबरोबर कुटुंबासाठी रोजीरोटी महत्वाची आहे. कवी आपल्या कौटुंबिक प्रेमापोटी पत्नीवरील प्रेम कमी करीत कुटुंबासाठी तीने आधार व्हावा ही भावना व्यक्त करताना, कवी लिहितात,

''... पंखाखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला — कळवळला
नारायणा—गदगदला

शिक्यावरची भाकर घे पुटपुटला
उद्यापासून तिलाही काम बघ बाबा ..'' ६

प्रेमाच्या चंद्रापेक्षा कुंटुबासाठी भाकरीचा चंद्र महत्वाचा आहे. रोटीसाठी संघर्ष करीत असताना, सर्वाबद्दल आपुलकी आणि प्रेम जपणारा नायक दिसतो. कष्टकऱ्यांच्या जीवनात सातत्याने संघर्ष असतो. कंपनीत काम करताना प्रसंगी यंत्रयुगाच्या आघाताने जीव संपला जातो. आयुष्याची घंटा संपते. आपल्या देखत आपल्या सहकार्याचे जीवन समाप्त होताना दिसते. तेव्हा कवीचे मन व्याकुळ होते. मृत्यू या सत्याचे वास्तव समोर येते. या विदारक परिस्थितीचे चित्रण करताना कवी 'घंटा' या कवितेत कवी लिहितात.,

'' तिचे शव माझ्या पुढयात आहे.
एक उघडा डोळा: माझ्यावर रोखलेला
दुसरा मिटलेला तिच्या मालकीचा '' ७

कष्टकरी, कामगार यांच्या कष्टाला आणि जीवाला मोलच नाही. अशी आपली व्यवस्था आहे. सातत्याने कष्ट करणे. जीवन संघर्ष चालू ठेवणे हे कामगारांच्या नशिबी येते. याचे दु:ख कवीला होते. आपण सातत्याने कष्ट करीत आहोत. आपणाकडून कोणलाही सुख मिळत नाही. कुटुंबाच्या अडचणी सोडवू शकत नाही. घरावर आणि घरातील माणसांवर प्रेम, माया करता येत नाही. अशा वेळी आपण उगीच संसार निर्माण केला, अशी मनात भावना निर्माण होते. आपण कोणलाही सुखी ठेवू शकत नाही. 'उगीचच' या कवितेत भावना व्यक्त करताना, कवी लिहितात.

'' उगीचच जोडली बायकोपोरे, सगेसोयरे उगीचच कुडून घेतले एक घर जन्मभर''(पृष्ठ २५)

अधिक काम, कमी दाम या समाजप्रवृत्तीमुळे कामगारांचे रोजचे जगणे महाग होत आहे. कुंटुबाच्या गरजा पूर्ण करता येत नाही. पैशाभावी मोठा संघर्ष मनात आणि संसारात निर्माण होतो. अशा संघर्षमय परिस्थितीत माणूस हतबल होतो. प्रसंगी हतबल होत आपल्याच चिमुकल्यांना मारहाण करतो. मारहानीमुळे आपला बाप मुलांना काळ वाटतो. अशा वागण्यामुळे आपण 'असा कसा दगड झालो.' ही भावना मनात निर्माण होते. 'असा कसा दगड झालो.' या कवितेत कवी लिहितात.

'' असा कसा दगड झालो.
बाप असून काळ वाटलो त्यांना,
कशी चिडीपीप होऊन समोर
थरथरली पखांत
हात जोडीत टिपे गाळीत नाही.
नाही .. नाही चा पुकारा करीत.'' ८

कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतून कामगार जीवन, त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न, समाज व्यवस्थेमुळे होणारे शोषण आणि सर्वांमधून जीवन जगण्याची कामगाराची धडपड दिसून येते. या जगात कामगारांनी समाजाच्या उन्नतीसाठी जे काही केले ते सर्व चांगले गृहीत धरले. कामगारांच्या विकासाला आणि निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचा विचार मांडलेला आहे. या सर्वांमधून कामगारांना स्व: जीवनाचा अर्थ समजला. येथील

समाजव्यवस्था समजली. या सर्वांमधून कामगारांमध्ये माणसाने माणूस म्हणून सत्यासोबत जगणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

कवी नारायण सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' या कवितासंग्रहातील निवडक कवितांचा विचार केला असता, कामगार वर्गाचे शोषण होत आहे, हे दिसून येते. कामगारांचे होणारे शोषण थांबविणे आवश्यक आहे. कामागर कोणत्याही संकटाला न घाबरता तो सामोरे जातो. संकटसमयी किंवा अडचणीच्या प्रसंगी स्वः चिंतन करतो. मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतो. या सर्वांबरोबर समाज वागत असताना स्वःचा शोध घेतो. कोणत्याही परिस्थितीत सत्य शोधून त्याला समोर ठेवून चालत असतो. हे निवडक कवितांचा अभ्यास केला असता दिसून येते.

**शिफारशी :**

कवी नारायण सुर्वे यांच्या माझे विद्यापीठ या काव्यसंगहातील निवडक कवितांचा विचार करीत कामगारांचे, कष्टकऱ्यांचे होणारे शोषण स्पष्ट दिसत आहे. हे शोषण थांबविणे आवश्यक आहे. त्यासाठी कामगारांच्या मुलांना शिक्षण व्यवस्था पुरविण्यात यावी. जेणे करून त्यांना ज्ञान आणि विकास या दोन्ही गोष्टी मिळणे आवश्यक आहे. जे जीवन कामगारांच्या वाटयाला आलेले आहे तेच जीवन त्यांच्या मुलाच्या वाटयाला येऊ नये. कामगार वर्गाचे पगार आणि त्यांचे राहणीमान चांगले व्हावे, यासाठी विशेष योजना निर्माण करणे व महागाईनुसार आवश्यक पगार मिळणे गरजेचे आहे. कामावर असताना कामगाराचा मृत्यू झाल्यास कुंटुबाचे पालनपोषण अशी योग्य भरपाई मिळावी. ही अपेक्षा आहे.

**समारोप :**

कवी नारायण सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचा अभ्यास केला असता, कामगर जीवनाचे, त्यांच्या मनोवस्थेचे, सामाजिक व्यवस्थेचे, कामगारांच्या होणाऱ्या शोषणाचे चित्रण केले आहे. कामगारांच्या वाडयावस्त्यात राहणारे,स्वःत कामगार जीवनाचा अनुभव घेणारे कवी असल्यामुळे कामगारांचे पारदर्शक जीवन मांडलेले आहे. कामगार जीवनाचे चित्रण करीत कामगारांच्या स्वप्नांचे आणि भविष्याचे चिंतन केले आहे.कामगार वर्ग सातत्याने कष्ट करीत असताना, समाजस्वच्छता ठेवत असताना, समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत असताना तो उपेक्षित ठरला आहे. कवी नारायण सुर्वे यांच्या काव्यलेखनाबद्दल डॉ.एस.एम.भोसले लिहितात, '' नारायण सुर्वे यांची कविता ही नारायण सुर्वे नामक कवीची कहाणी नसून उभ्या विश्वास सडून जात असलेल्या, खचत पिचत असलेल्या अवघ्या श्रमणाऱ्यांच्या श्रद्धानिष्ठांची जिवंत कहाणी आहे. ती कुणा एका जिंदगीच्या बरबादीची कहानी नसून अवघ्या जिदंगीच्या उत्थानाची कथा आहे. म्हणून हार नाही, मागार नाही, धाकाने प्रहार करीत पुढे सरणे आहे'' [१] त्यामुळे अशा कामगार जीवनातील व व्यवसथेतील समस्या दूर होणे ही काळची गरज आहे. असे नमूद करावेसे वाटते.

संदर्भ सूची :


१. मांजर्डेकर स्नेहल( संपा.) *'श्रमकल्याणयुग साहित्य संमेलन विशेषांक,'* कल्याण आयुक्त महाराष्ट कामगार मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९५ पृष्ठ क्र ४२
२. सुर्वे नारायण, *'ऐसा ग ब्रह्म,मी'*,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई प्रथम आवृत्ती १९६२ पृ ८
३. सुर्वे नारायण,*'माझे विद्यापीठ'*,पॉप्युलर प्रकाशन,पुणे चौथे पुनर्मुद्रण,२०१७ पृष्ठ १३
४. कुल्ली स.त्र्यं, *'तीन अर्वानिन कवी'* मार्क्सवादी दृष्टिक्षेप,लोकवाङ्.य गृह मुंबई प्रथम आवृत्ती १९८९ पृष्ठ १०४
५. सुर्वे नारायण, *'माझे विद्यापीठ'*,पॉप्युलर प्रकाशन,पुणे चौथे पुनर्मुद्रण,२०१७ पृ १४
६. सुर्वे नारायण, *'माझे विद्यापीठ'*,पॉप्युलर प्रकाशन,पुणे चौथे पुनर्मुद्रण,२०१७ पृष्ठ १८
७. सुर्वे नारायण,*'माझे विद्यापीठ'*,पॉप्युलर प्रकाशन,पुणे चौथे पुनर्मुद्रण,२०१७ पृ २३
८. सुर्वे नारायण,'माझे विद्यापीठ',पॉप्युलर प्रकाशन,पुणे चौथे पुनर्मुद्रण,२०१७ पृ३३
९. कुल्ली स.त्र्यं, 'तीन अर्वाचिन कवी' मार्क्सवादी दृष्टिक्षेप, लोकवाङ्.य गृह मुंबई प्रथम आवृत्ती १९८९ पृष्ठ ११२